# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## गुरुवार, दिनांक मार्च ९, २०२३/ फाल्गुन १८, १९४४ (शके)

३३. अध्यक्ष : शुक्रवार, दिनांक १० मार्च,२०२३ रोजी अशासकीय कामकाज (विधेयके) घेण्यात येणार आहे. दिनांक ३० डिसेंबर,२०२२ रोजीचे कामकाज पत्रिकेवरील पुढे ढकलण्यात आलेले विचारार्थ प्रलंबित एकूण ०८ अशासकीय विधेयके चर्चेकरिता घेण्यासाठी निश्चित करण्यात आले आहेत. अशासकीय विधेयकांना द्यावयाचा वेळ अशासकीय सदस्यांची विधेयके व ठराव समितीने निश्चित करावयाचा असतो, तथापि, सध्या अशासकीय सदस्यांची विधेयके व ठराव समिती नव्याने घटित करण्यात येत असल्याने मी शुक्रवार,दिनांक १० मार्च,२०२३ रोजी अशासकीय कामकाजासाठी उपलब्ध असलेल्या १५० मिनिटांच्या वेळेपैकी ३० मिनिटांचा वेळ दिनांक ०३ मार्च,२०२३ रोजीच्या कामकाज पत्रिकेवरील पुढे ढकलण्यात आलेल्या पुर:स्थापनार्थ असलेल्या ०९ अशासकीय विधेयकांना व उर्वरित १२० मिनिटांचा वेळ खालील नमूद विचारार्थ असलेल्या एकूण ०८ अशासकीय विधेयकांना देत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० — भारतीय दंड संहिता व फौजदारी प्रक्रीया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक,२०१९ — **श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. यांचे** | १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| २) | सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ — महाराष्ट्र धर्मांतर बंदि विधेयक, २०१९ — **श्री.अतुल भातखळकर,वि.स.स. यांचे** | १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| ३) | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०२० - **श्री.अतुल भातखळकर,वि.स.स. यांचे** | १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| ४) | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १० — महाराष्ट्र चिकित्सालयीन आस्थापना (नोंदणी व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२० - **श्री.अतुल भातखळकर,वि.स.स. यांचे** | १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| ५) | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ - महाराष्ट्र कर्मचाऱ्यांची मातापित्याप्रती जबाबदारी आणि उत्तरदायित्व व देखभाल यासबंधीच्या मानकांबाबत विधेयक, २०२० - **श्री.अमित साटम,वि.स.स. यांचे** | १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| ६) | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ — राज्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, २०२० - **श्री.प्रकाश आबिटकर,वि.स.स. यांचे** | १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| ७) | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ — महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०२० - **श्री.अतुल भातखळकर,वि.स.स. यांचे** | १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| ८) | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ — महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२० - **श्री. सुनिल प्रभू,वि.स.स. यांचे** | १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |

**विधान भवन,**
**मुंबई**
**दिनांक : ९ मार्च, २०२३**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

प्रति :

(१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व मा.सदस्य.

(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.

(३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष यांना अग्रेषित.

(४) संगणक कक्ष व MKCL

C:\Users\९\Desktop\पत्रक भाग दोन.docx